# मराठीतही रुजताहेत ई-बुक, आय-बुक

## दररोज होते पाचशे पुस्तकांची खरेदी; कमी किमतीमुळे वाचकांची पसंती

**सकाळ विशेष**

**श्रद्धा पेडणेकर** : सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. १२ : आता मराठी साहित्यविश्वाचं दालनही एका क्लिकवर उपलब्ध झालं आहे. कॉम्प्युटरवर बसून पुस्तक वाचणार कोण, अशी ई-बुक विरोधात सुरवातीच्या काळात ओरड झाली. पण आता तंत्रज्ञानाच्या विकासामुळे ई-बुक्स, आय-बुक्सला वाचकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून, दररोज सुमारे पाचशे पुस्तकांची ऑनलाईन खरेदी होत आहे. किंमत कमी असल्यानं वाचकांच्या फायद्याबरोबरच 'पायरसी'ला चाप बसण्यासही मदत होत असल्यानं प्रकाशकांकडूनही त्याचं स्वागत होत आहे.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे, तसंच इंटरनेटच्या वाढत्या विस्तारामुळे नुसत्या एका क्लिकवर कोणतीही वस्तू हवी तेव्हा उपलब्ध होते. त्याचप्रमाणं पुस्तकंही दुकानात जाऊन विकत घेण्याऐवजी ती एका क्लिकवर विकत घेता येतात. हा ट्रेंड इंग्रजी साहित्यविश्वात होता, तसाच मराठी साहित्यविश्वातही प्रायोगिक तत्त्वावर सुरू झाला. कॉम्प्युटरवर बसून पुस्तक वाचताना पुस्तक हातात घेऊन वाचल्याचा 'फील' येत नाही, अशी ओरड पूर्वी होत होती. मात्र, लॅपटॉप, आयपॅड वापरणाऱ्या 'टेक्नोसॅव्ही जनरेशन'मध्ये या संकल्पनेला वाढता प्रतिसाद मिळताना दिसत आहे. छपाईचा खर्च वाचत असल्याने ई-बुकच्या माध्यमातून मिळणारी पुस्तकं, छापील पुस्तकाच्या किमतीच्या २० ते २५ टक्के कमी किमतीनं मिळतात. ई पुस्तकांचा वाढता प्रतिसाद पाहून अनेक प्रकाशक ई-बुकचे प्रकल्प राबवत आहेत.

पान ८ वर »



# मराठीतही रुजताहेत ई-बुक, आय-बुक

» **पान १ वरून**

सध्या bookganga.com या वेबसाइटवर अनेक प्रकाशकांची ई-बुक उपलब्ध आहेत. पुस्तक डाउनलोड करण्यासाठी फ्री सॉफ्टवेअर कॉम्प्युटरवर डाउनलोड केल्यानंतर पुस्तकाची किंमत चेक, कॅश, क्रेडिट कार्ड याच्या माध्यमातून अदा करावी लागते. त्यानंतर वाचकाला मेल करून एक लिंक दिली जाते. ती लिंक कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपवर डाउनलोड केल्यानंतर तिथं ते पुस्तक वाचायला मिळू शकतं. मात्र, ई-बुकच्या पायरसीच्या दृष्टीनं घेतलेली काळजी किंवा माध्यमातील मर्यादा म्हणजे ज्या कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपवर लिंक डाउनलोड केली आहे, ते त्याव्यतिरिक्त कुठंही उपलब्ध होणार नाही. दिवसाला जवळजवळ पाच हजार हिट्स असलेल्या या साइटच्या माध्यमातून १० ते १५ टक्के लोक भेट दिल्यानंतर पुस्तक खरेदी करतात, अशी माहिती या वेबसाइटचे संचालक संजय पेठे यांनी दिली.

## ग्रंथालीची तीनशे ई-बुक

जी. ए. कुलकर्णींची पुस्तकं, सावरकरांवरील पुस्तकं, मैत्रेय प्रकाशनाची पुस्तकं, अक्षर प्रकाशन, 'जीवनरंग', 'सकाळ', त्याचप्रमाणं 'मॅजिस्टि'कची पुस्तकंही येत्या वाचकांसाठी उपलब्ध होणार आहेत.